www.maharashtratimes.com
मटा+TOI : पुण्यात नंबर १
महाराष्ट्र टाइम्स
पुणे, शुक्रवार, दि. १० जुलै २०२६

# भरतनाट्यम कार्यक्रम येत्या रविवारी

**पुणे :** 'फ्युएल शिक्षण संस्थेतर्फे 'माउली-एक कालातीत परंपरा' हा आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या भरतनाट्यम नृत्यांगना कलाईमामनी बालादेवी चंद्रशेखर यांचा विशेष नृत्याविष्कार येत्या रविवारी, १२ जुलै रोजी सायंकाळी पाच वाजता कोथरूडमधील एमईएस सभागृहात होणार आहे. या वेळी उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील उपस्थित राहणार आहेत,' अशी माहिती संस्थेचे संस्थापक व अध्यक्ष डॉ. केतन देशपांडे यांनी गुरुवारी दिली. सीएसआरच्या माध्यमातून संस्थेत शिक्षण घेणाऱ्या दहा विद्यार्थिनींच्या शिक्षणासाठी निधी उभारण्याच्या उद्देशाने कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. 'सुंदर ते ध्यान', 'रूप पाहता लोचनी', 'उदंड पाहिले उदंड ऐकिले' यांसह अनेक प्रसिद्ध अभंग आणि भारूडांचा यात समावेश असेल, असे देशपांडे यांनी सांगितले.